दै. देशोन्नती दि. 09-01-25

# पत्नीच्या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्या पती व सासुला कारावासाची शिक्षा

देशोन्नती वृत्तसंकलन

- आरोपी पतीस सव्वा लाख तर सासुला २५ हजार रुपये दंड
- कंधार येथील जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निर्णय

**कंधार :** मुदखेड तालुक्यातील डोणगाव येथील रहिवासी प्रकाश सोनटक्के (३७ वर्ष) याचे टाकळगाव (ता.लोहा) येथील मयत ज्योती सोनटक्के हिच्याशी २००७ मध्ये लग्न झाले होते. तिच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या पतीला व सासूच्या जाचाला कंटाळून ज्योतीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी कंधार येथील जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायाधीश वर्ग २ चे न्यायाधीश अमिताभ पंचभाई यांनी आरोपी पती प्रकाश धोंडीबा सोनटक्के यास पाच वर्षाचा कारावास आणि सव्वालाख रूपये दंड तर व सासू रत्नमाला सोनटक्के (६० वर्ष) हिस दीड वर्ष शिक्षा व २५ हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली आहे.

लोहा तालुक्यातील टाकळगाव येथे आपल्या माहेरी मयत ज्योती सोनटक्के ही आपल्या मुलाबाळाला घेऊन आई वडिलांसोबत राहत होती. पती प्रकाश धोंडीबा सोनटक्के रा. डोनगाव ता. मुदखेड याने १३ ऑगस्ट २०१६ रोजी मयत पत्नीच्या माहेरी जाऊन तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ करून मारहाण केल्याने तिने त्याच्या त्रासाला कंटाळून स्वतःच्या अंगावर रॉकेल टाकून पेटवून घेतले. ती मोठ्या प्रमाणात जळाल्याने तिला उपचारासाठी विष्णुपुरी येथील कै डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचार चालू असताना १९ ऑगस्ट रोजी ती मरण पावली. धम्मानंद विठ्ठल चिंतोरे यांनी सोनखेड पोलिसात २० ऑगस्ट रोजी फिर्याद दिल्याने आरोपी पती व सासू विरुध्द कलम ४९८, ३०६ भादंवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अतिरिक्त जिल्हा न्यायालय वर्ग २ या न्यायालयात दोषारोपपत्र दखल करण्यात आले होते. या प्रकरणात मयताची मृत्यू पूर्वीची साक्ष ग्राह्य धरून सरकारी पक्षातर्फे १० साक्षीदार तपासण्यात आले. तसेच सरकारी पक्षाच्यावतीने करण्यात आलेला युक्तिवाद ग्राह्य धरून ८ जानेवारी रोजी जिल्हा न्यायाधीश वर्ग २ अमिताभ पंचभाई यांनी ३०६ प्रमाणे पतीस पाच वर्षाचा कारावास व सव्वा लाख रूपये दंड तर सासू रत्नमाला हिला ४९८ भादवी प्रमाणे १ वर्ष ६ महिन्याचा कारावास व २५ हजार रूपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. या प्रकरणात सरकार पक्षाची बाजू सरकारी अभियोक्ता ॲड. महेश कागणे यांनी मांडली.